अखेर राहुल गांधी यांच्या मागणीला यश कोरपणा शहरात अभिनंदन >>पान 2

माझ्या आयुष्यात दोन ते तीन वेळा मुख्यमंत्री बनण्याचा योग येऊन गेला : छगन भुजबळ >>पान 3

मेहकर नगर परिषदेचे रेकॉर्ड रुम जळून खाक >>पान 4

**सुविचार**

समजूतदारपणा आणि संयम हे जीवनात आवश्यक आहेत.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 259 ■ रविवार, दि. 04 मे 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



'तिच्या आई-वडिलांनी माझा संसार मोडला!' घटस्फोटावर संजूबाबांचा धक्कादायक खुलासा

आतील पान

# पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी सुरुच

## ■ केंद्र सरकारकडून आणखी एक मोठा दणका
## ■ अर्थव्यवस्थेला तगडा झटका बसणार

**नवी दिल्ली : पहलगाममध्ये झालेल्या पर्यटकांवरील क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर भारताकडून कडक कारवाईसाठी पडद्यामागून तयारी सुरु असली, तरी तत्पूर्वी पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी सुरुच ठेवली आहे. दोन्ही देशांमधील तणाव वाढत असल्याने भारताने पाकिस्तानमधून येणाऱ्या सर्व वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने २ मे रोजी एका सूचनेत म्हटले आहे की ही बंदी तत्काळ लागू होईल.**



भारत सरकारने परराष्ट्र व्यापार धोरण, २०२३ मध्ये एक नवीन परिच्छेद २.२० अ समाविष्ट केला आहे, ज्यामध्ये पाकिस्तानमधून आयात करण्यावर बंदी असे म्हटले आहे. सर्व वस्तूंची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा वाहतूक, मुक्तपणे आयात करता येण्याजोगी असो वा नसो, पुढील आदेशापर्यंत तत्काळ प्रभावाने प्रतिबंधित करण्यात आली आहे. या निर्बंधातील कोणत्याही अपवादासाठी भारत सरकारची पूर्व परवानगी आवश्यक असेल, असे डीजीएफटीने आपल्या अधिसूचनेत म्हटले आहे.

व्यापार बंदीमुळे पाकिस्तानच्या निर्यात क्षेत्राला दणका बसणार आहे. ज्यामध्ये सिमेंट, कापड आणि कृषी उत्पादनांसारख्या वस्तूंसाठी सीमापार व्यापारावर अवलंबून आहे. औपचारिक व्यापार आधीच मर्यादित असल्याने, या हालचालीमुळे अनौपचारिक व्यापार मार्ग देखील विस्कळीत होऊ शकतात आणि आर्थिक दबाव वाढू शकतो. २२ एप्रिल रोजी काश्मीरमध्ये पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या प्राणघातक हल्ल्यामागील एक पाकिस्तानी दहशतवाद्यांपैकी एक, हाशिम मुसा, पाकिस्तानी लष्कराच्या विशेष दलाचा माजी पॅरा कमांडो असल्याचे तपासात समोर आलं आहे. केंद्र सरकारने या हल्ल्यासाठी पाकिस्तानला जबाबदार धरले आणि त्यामागील लोकांना शिक्षा करण्याचे आश्र्वासन दिले. पाकिस्तानने कोणताही संबंध नाकारला असून भारताने लष्करी कारवाई केल्यास प्रत्युत्तर देईल असा इशारा दिला आहे. गेल्या १० दिवसांपासून नियंत्रण रेषेवर युद्धबंदीचे उल्लंघन होत आहे.

### आतापर्यंत कोणकोणत्या मार्गाने पाकिस्तानला दणका?

भारताने पाकिस्तानविरुद्ध आधीच अनेक पावले उचलली आहेत, राजनैतिक संबंध कमी केले आहेत. पाकिस्तानविरुद्धच्या उपाययोजनांमध्ये सिंधू पाणी करार निलंबित आणि पाकिस्तानकडून येणाऱ्या विमानांसाठी त्याचे हवाई क्षेत्र बंद करणे समाविष्ट आहे. प्रत्युत्तरादाखल, पाकिस्तानने १९७२ चा सिमला करार रद्द करणे, भारतीय विमानांसाठी त्यांचे हवाई क्षेत्र बंद करणे, वाघा सीमा क्रॉसिंग बंद करणे, व्यापार थांबवणे आणि सिंधू कराराअंतर्गत पाणी वळवण्याचा भारताचा कोणताही प्रयत्न युद्धाचा प्रयत्न म्हणून पाहिला जाईल असा इशारा दिला आहे.

# दहावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात वाढ



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने दरवर्षी १०वी आणि १२वीच्या परीक्षा घेतल्या जातात. करिअरच्या दृष्टीने विद्यार्थ्यांसाठी या परीक्षा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखल्या जातात. यामुळे १०वी किंवा १२वीत असलेले विद्यार्थी आणि त्यांचे पालक सतत दबावात असतात. यशस्वी होऊ का असा प्रश्न त्यांना सतावत असतो. तर अशा चिंतेत असलेल्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. दहावीच्या परीक्षेच्या शुल्कात वाढ करण्यात आली आहे.

दहावीच्या २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षासाठी ५२० रुपये परीक्षा शुल्क आकारण्याचा निर्णय झाला आहे. याआधी २०२४ - २५ या शैक्षणिक वर्षात पहिल्यांदाच दहावीची परीक्षा देत असलेल्यांसाठी परीक्षा शुल्क ४७० रुपये होते. यामुळे २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षात पहिल्यांदाच दहावीची परीक्षा देत असलेल्यांना आधीच्या वर्षाच्या तुलनेत परीक्षा शुल्क म्हणून जास्तीचे ५० रुपये मोजावे लागणार आहेत. परीक्षा शुल्कात थेट ५० रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

दहावीच्या परीक्षा शुल्कात ५० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कार्यकारी परिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत झाला. यावर पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

राज्य शिक्षण मंडळाच्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीत परीक्षा शुल्कवाढीचा मुद्दा चर्चेला आला होता. या चर्चेनंतर निर्णय घेत फक्त परीक्षा शुल्कात वाढ झाली. इतर शुल्कांमध्ये जसे प्रशासकीय शुल्क, गुणपत्रक शुल्क व प्रमाणपत्र शुल्कात कोणताही बदल केला नाही. विद्यार्थ्यांना परीक्षेनंतर मिळणाऱ्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रे लॅमिनेट स्वरूपात दिली जातात. यासाठी प्रत्येकी २० रुपये शुल्क आकारले जात आहे, हे शुल्क देखील विद्यार्थ्यांकडूनच घेतले जाते. असे मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी वापरताय युरोपचे ॲप अन् चिनी यंत्रणा

नवी दिल्ली : जम्मू काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यासंदर्भात एक महत्वाची माहिती समोर आली आहे. २६ पर्यटकांची हत्या करणारे यमदूत म्हणजेच दहशतवादी अजूनही काश्मीरच्या जंगलात लपल्याचं समजतंय. सुरक्षा यंत्रणांकडून काश्मीरमध्ये हाशिम मुसाचा शोध सुरु आहे. दहशतवादी हाशिम मुसा त्याच्या साथीदारासह काश्मीरच्या जंगलात लपला असून, सुरक्षा यंत्रणांनी त्याचा शोध सुरू केला आहे. धक्कादायक म्हणजे जंगलात रस्ते शोधण्यासाठी दहशतवाद्यांकडून इंटरनेटशिवाय वापरू शकतो अशा ॲल्पाईन क्वेस्ट मोबाईल ॲपचा वापर केला जातोय. तसंच दहशतवाद्यांकडे चिनी बनावटची अत्याधुनिक कम्युनिकेशन यंत्रणा आहे. ॲल्पाईन क्वेस्ट नावाचे हे ॲप फ्रान्सचे आहे आणि दहशतवादी नियंत्रण रेषेवर घुसखोरी करण्यासाठी त्याचा वापर करत आहेत. पण हाशिम मुसा आणि त्याचे साथीदार जम्मू आणि काश्मीरच्या जंगलातही याचा वापर करत आहेत. आयएसआयने हे ॲप दहशतवाद्यांना उपलब्ध करून दिले आहे, जे ऑफलाइन देखील काम करते. ॲल्पाईन क्वेस्ट या ॲपद्वारे ऑफलाईन लोकेशन वापरता येते. दहशतवादी आता स्थानिक लोकांवर (मार्गदर्शकांवर) कमी अवलंबून राहू इच्छितात. सुरक्षा दलांच्या मजबूत नेटवर्किंगमुळे, दहशतवादी हल्ले अंमलात आणण्यापूर्वीच ते उधळून लावले जात होते, त्यामुळे दहशतवाही आता ॲल्पाईन क्वेस्ट ॲप वापरतात. कोणत्याही ठिकाणाचे स्थान आणि दिशा जाणून घेण्यासाठी आवश्यक असलेला गुगल मॅप इंटरनेटवर चालतो. पण अशा परिस्थितीत सुरक्षा एजन्सींकडून पकडले जाण्याचा धोका असतो. मात्र ॲल्पाईन क्वेस्ट हे ॲप इंटरनेटशिवाय वापरता येते. ॲल्पाईन क्वेस्टद्वारे कोणीही सहजपणे पर्वत, जंगल आणि नदीचे मार्ग शोधू शकतो, ते देखील इंटरनेटशिवाय. दहशतवाद्यांकडे चिनी बनावटची अत्याधुनिक कम्युनिकेशन यंत्रणा देखील असल्याची माहिती मिळत आहे. चिनी बनावटची अत्याधुनिक कम्युनिकेशन यंत्रणा चीनने पाकिस्तानला दिली असावी, ती आता दहशतवाद्यांपर्यंत पोहचली आहे. जगभरातील प्रगत सैन्य युद्धक्षेत्रातून कमांड सेंटरशी संवाद साधण्यासाठी किंवा व्हिडीओ पाठवण्यासाठी या यंत्रणांचा वापर केला जातो. ही यंत्रणा देखील इंटरनेटशिवाय वापरली जाते.

# संपूर्ण महाराष्ट्राला अवकाळी पुन्हा झोडपणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या पश्र्चिमी चक्रावताच्या प्रभावामुळे हिमाचल प्रदेश उत्तराखंड, दिल्ली अशा उत्तरेकडील राज्यांमध्ये तुफान पाऊस सुरू आहे . तर दक्षिणेकडील राज्यांमध्येही वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे . महाराष्ट्रात तापमानाचा पारा प्रचंड वाढला असून आता येत्या चार दिवसात कोकणपट्ट्यासह मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात अवकाळी पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत . दरम्यान आज संपूर्ण महाराष्ट्रात सामान्य तापमान होऊन अधिक तापमानाची नोंद झाली .राज्यभरात आता प्रचंड रखरख वाढली आहे .उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत .

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार सध्या चक्राकार वाऱ्यांची स्थिती राजस्थान सह मध्य प्रदेश व खालपर्यंत सक्रिय असल्याने महाराष्ट्रात पुढील पाच दिवस अवकाळी पाऊस हजेरी लावणार आहे . ३-४ व ५ मे रोजी विदर्भासह मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचे इशारे आहेत . त्यानंतर उत्तर महाराष्ट्र मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यातील काही जिल्हांमध्ये अवकाळी पाऊस येणार आहे . गेल्या आठवडाभरापासून विदर्भातील काही जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला होता.

राज्यात बहुतांश ठिकाणी तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे. आजपासून (३ एप्रिल) पुढील पाच दिवस बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता आहे .अवकाळी पावसाची शक्यता असली तरी तापमानाचा पारा ४०अो च्या पुढेच असल्याची नोंद होत आहे . प्रचंड उकाडा वाढला आहे .नागरिकांना घराबाहेर पडताना धडकी भरेल एवढं तापमान नोंदवला जात असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे . गेल्या चार ते पाच दिवसांपासून सोलापूर मध्ये तापमान ४५ अंशांच्या उंबरठ्यावर आहे .विदर्भात पावसाचा इशारा असला तरी ४२ ते ४५ अंशापर्यंत तापमान टेकलं आहे .मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून कमाल तापमान ४० ते ४५ अंशापर्यंत गेलंय . अनेक भागांमध्ये दुपारच्या वेळी शुकशुकाट झालाय .रस्ते ओस पडले आहेत .

**आज कोणत्या शहरात किती तापमान?**

सोलापूर ४४.७, अकोला ४४.९, जळगाव ४३.९, अमरावती ४३.४, बीड ४२.८, नांदेड ४२.३, चंद्रपूर ४२.२, वाशिम ४२.६, परभणी ४१.४, लातूर ४१.०, सांगली ४१.०, उस्मानाबाद ४१.५, वर्धा ४०.५, पुणे ४०.६, सातारा ४०.६, नाशिक ३९.९, गडचिरोली ३९.०, सिंधुदुर्ग ३९.०, नागपूर ३९.४, ठाणे ३७.०, पालघर ३६.४, रायगड ३६.२, गोंदिया ३६.०, भंडारा ३६.०, मुंबई उपनगर ३४.४, मुंबई शहर ३४.२, रत्नागिरी ३४.२

**पावसाचे इशारा कुठे व कधी?**



३ एप्रिल: नाशिक, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया ,गडचिरोली अवकाळी पावसाचे येलो अलर्ट

पुणे, अहिल्यानगर ,धुळे, नंदुरबार, नांदेड आणि लातूर या जिल्ह्यांना हलक्या पावसाचा इशारा आहे .

४ एप्रिल: नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, अमरावती यवतमाळ वर्धा चंद्रपूर नागपूर भंडारा गोंदिया गडचिरोली -अवकाळी पावसाचा येलो अलर्ट

मुंबई, ठाणे ,रायगड ,पुणे ,सातारा, बीड ,जालना, परभणी, हिंगोली, नांदेड जिल्हांमध्ये पावसाची शक्यता आहे .

५ एप्रिल : संपूर्ण राज्यात पावसाची शक्यता .मध्य महाराष्ट्र कोकण मराठवाडा विदर्भ सर्व विभागांमध्ये बहुतांश ठिकाणी अलर्ट .

६ एप्रिल : सातारा पुणे ठाणे पालघर नाशिक अहिल्यानगर बीड जालना छत्रपती संभाजी नगर जळगाव धुळे नंदुरबार यवतमाळ चंद्रपूर या जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट .

कोकण मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात उर्वरित ठिकाणी हलक्या सरींचा अंदाज

७ एप्रिल : संपूर्ण कोकणपट्टा मध्य महाराष्ट्र उत्तर महाराष्ट्र व बहुतांश मराठवाड्यात अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आलाय .यात विदर्भाचा समावेश नाही .

# संजय रावतांचं डोकं तपासल पाहिजे; गिरीश महाजन यांची टीका

**दैनिक आपला विदर्भ**

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगावातील जिल्हा रुग्णालयात आता नवीन येणाऱ्या मशीन लावलेल्या आहे या मशीनमध्ये मला वाटतं पहिले संजय राऊत त्यांच्या डोक्याच्या तपासणीची ट्रायल घ्यावी, असे वाटत. ते काय बोलतील त्याचा भरोसा नाही डोकं फिरल्यासारखं ते बोलतात. त्यामुळे संजय रावतांच डोकं तपासलं पाहिजेत अशी टीका मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना केली.

लाडक्या बहिणींना आता देण्यासाठी आदिवासी विभागाचे पैसे वळवल्याने संजय शिरसाठ नाराज व्यक्त केली आहे मात्र पैसे, वळवण्याची आमच्याकडे गरज नाहीये, पुरेसा फंड आणि निधी आमच्याकडे आहे. सर्व नियोजन करूनच आम्ही सर्व योजना या केलेल्या आहेत.थोडाफार इकडे तिकडे होईल मात्र, कुणाचाही नेते इतर कुणालाही दिला जाणार नाही.सगळ्यांना वेळेवर पैसे दिले जातील. कोणाचीही पैसे कापले जाणार नाहीत. कोणताही निधी इकडे तिकडे वळविला जाणार नाही. अर्थ खात्याने तात्पुरती काही व्यवस्था केली असेल त्याबद्दल मला काही माहिती नाही. लाडक्या बहिणीची योजना ही चालू राहील आणि इतर कुठल्या विभागांमध्ये पैशांची कमतरता राहणार नाही. कायमस्वरूपी वळवलेले नसतील. तात्पुरते वळविले असतील. सगळ्यांनाच वाटतं मागच्या काळात आपण बघितले



असेल की, अनेक जणांची बॅनर लागले. प्रत्येकाची इच्छा असते तो व्यक्त करत असतो. मात्र, काळ ठरवत असतो कोण काय होणार आहे. संजय राऊत म्हणता आहे. हा होणार नाही तो होणार नाही. मात्र, त्यांनी तर उद्धव ठाकरे यांना थेट पंतप्रधान करून टाकले आहे. देशाचे पंतप्रधान उद्धव ठाकरे व्हावे असे किती वेळा संजय राऊत म्हणाले. संजय रावतांचं डोकं तपासल पाहिजे, जळगावातील जिल्हा रुग्णालयात आता नवीन येणाऱ्या मशीन लावलेल्या आहे. या मशीनमध्ये मला वाटतं पहिले संजय राऊत त्यांच्या डोक्याच्या तपासणीची ट्रायल घ्यावी, ते काय बोलतील त्याचा भरोसा नाही. डोकं फिरल्यासारखं ते बोलतात. शरद पवार गटातील नेत्यांचा अजित पवार गटात प्रवेशावर बोलताना ते म्हणाले की, आपल्या विरुद्धचे लढले त्यांना पक्षात घ्यायच नाही असा प्रोटोकॉल ठरलेला होता. याबाबतीमध्ये वरती बोलू, शरद पवार गटाला सोडून उद्धव ठाकरे गटाला सोडून अनेक लोक हे महायुतीमध्ये येत आहेत. जे लोक तिकडे गेले ते आमच्याकडे येणार होते.मात्र, गुलाबराव पाटील यांच्याशी चर्चा केली. आम्ही घेतलं नाही. पण महायुतीमध्ये जे ठरलं होतं त्यानुसार पक्ष प्रवेश करायला नको असं माझंही म्हणणं आहे.पण त्यांनी असं केलं असेल तर आम्हालाही असं करण्यासाठी मार्ग मोकळा आहे. त्या ठिकाणी पण कोणी बोलायला नको. कुणालाही निर्णय घेताना तपासून घेतलं पाहिजे आमचा भाजपचाही तसा प्रोटोकॉल आहे.शरद पवार नेहमी अदानी यांच्याशी चर्चा करत असतात. त्यांची मैत्री घट्ट आहे.तिकडे त्यांच्या लोकांना यांच्या विरोधात बोलायला सांगायचं. आणि इकडे मैत्री करायची. चर्चा करायची हे त्यांचं नेहमीच आहे. अशी टीका मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना केली.

## वैभव सूर्यवंशी : भारतीय क्रिकेटचे भविष्य

आयपीएल म्हणजे रत्नांची खाण असे म्हंटले जाते कारण दरवर्षी आयपीएल मध्ये असे काही नवीन रत्न उदयास येते की ज्या रत्नांनी संपूर्ण क्रिकेट विश्वच उजळून निघते. अशाच एका उगवत्या रत्नाने केवळ भारतीय क्रिकेटच नव्हे तर संपूर्ण क्रिकेट विश्वच उजुळून निघाले आहे आणि हे रत्न आहे अवघ्या १४ वर्षाचं आणि त्याचं नाव आहे वैभव सूर्यवंशी. सध्या आयपीएलमध्ये वैभव सूर्यवंशी या १४ वर्षाच्या मुलाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे अर्थात त्याने तसा कारनामा ही करून दाखवला आहे. मूळचा बिहार राज्यातील असलेला वैभव सूर्यवंशी हा अवघा १४ वर्षाचा युवा खेळाडू आहे. राजस्थान रॉयल्स या संघाने ज्यावेळी त्याच्यावर १ कोटी १० लाखांची बोली लावून त्याला आपल्या संघात घेतले त्याच वेळी त्याची चर्चा सुरू झाली. राजस्थान रॉयल्स संघाने या १४ वर्षाच्या मुलावर इतका मोठा दाव का लावला असा प्रश्न विचारला गेला त्याचे उत्तर शोधण्यासाठी थोडं मागे जावे लागेल. वैभव सुर्यवंशीने १२ व्या वर्षीच बिहार कडून १९ वर्षाखालील संघातून विनू मंकड चषक स्पर्धेत भाग घेतला. तिथे त्याने चांगली कामगिरी केल्याने त्याची निवड बिहारच्या रणजी संघात करण्यात आली. बिहारकडून रणजी स्पर्धेत खेळणारा सर्वात कमी वयाचा तो खेळाडू ठरला. १३ व्या वर्षी वैभवने विजय हजारे चषकात धावांचा रतीब घातला त्यामुळे त्याची भारताच्या १९ वर्षाखालील ब संघात निवड झाली. चार संघात झालेल्या स्पर्धेत त्याने ६ डावात १७७ धावा काढल्या त्यात त्याने दोन अर्धशतके झळकावली त्यामुळे ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारताच्या १९ वर्षाखालील मुख्य संघात त्याची निवड झाली. १९ वर्षाखालील कसोटीतील पदार्पणाच्या सामन्यात त्याने अवघ्या ५८ चेंडूत शतक झळकावले त्यावेळी त्याचे वय १३ वर्ष होते. त्यानंतर १९ वर्षाखालील आशिया कप स्पर्धेत तर त्याने धुमाकूळ घातला. तिथे युएई विरुद्ध त्याने ४६ चेंडूत ७६ धावा काढल्या तर उपांत्य फेरीत श्रीलंके विरुद्ध ३६ चेंडूत ६७ धावा काढल्या. या स्पर्धेपासून त्याची सर्वत्र चर्चा होऊ लागली. ही चर्चा राजस्थान रॉयल्स संघाच्या पदाधिकाऱ्यांना समजली. त्यांनी त्यांचा बॅटिंग कोच असलेल्या विक्रम राठोडला वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहण्यास सांगितली. विक्रम राठोड यांनी वैभवला खेळताना पाहिले आणि त्याला आपल्या संघात घेण्याचे निश्चित केले. त्यांचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड हा तर नवोदित खेळाडूंना संधी देण्यास प्रसिद्ध आहे. त्याने देखील वैभवची फलंदाजी पाहिली आणि त्याला संधी देण्याचे ठरवले आणि अशा प्रकारे त्याची राजस्थान संघात एन्ट्री झाली. आयपीएल सुरू झाली पण सुरुवातीच्या काही सामन्यात वैभवला संधी मिळाली नाही. लखनऊ या संघाविरुद्ध राजस्थान रॉयल्सने त्याला संधी दिली. वैभव या संधीची वाटच पाहत होता. त्याने या संधीचे सोने करायचे ठरवले आणि पहिल्याच चेंडूवर त्याने अनुभवी शार्दुल ठाकूरला पुढे सरसावत षटकार खेचला आणि सर्वांना चकित केले. या सामन्यात त्याने २० चेंडूत ३४ धावा काढून आपल्या आयपीएल कारकिर्दीची धडाकेबाज सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यातही त्याने चांगली खेळी केली मात्र आपल्या तिसऱ्या सामन्यात तर त्याने कमाल केली. गुजरात टायटन्स विरुद्धच्या या सामन्यात त्याने केवळ ३८ चेंडूत १०१ धावांची धमाकेदार खेळी करत शतक झळकावले. या शतकासोबत त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. तो आयपीएल इतिहासातील सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा खेळाडू ठरला. केवळ आयपीएलच नाही तर टी २० क्रिकेट इतिहासात सर्वात कमी वयाचा शतक झळकावणारा तो खेळाडू ठरला. आयपीएलमध्ये सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा तो भारतीय ठरला. त्याने अवघ्या ३६ चेंडूत शतक झळकावत युसुफ पठाणचा विक्रम मोडला. एका सामन्यात त्याने सर्वाधिक षटकार मारणारा भारतीय खेळाडू ठरण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावावर केला. या सामन्यात त्याने ११ षटकार खेचले ते ही ईशांत शर्मा, मोहम्मद सिराज, वॉशिंग्टन सुंदर आणि राशिद खान या आंतरराष्ट्रीय खेळाडूंविरुद्ध. त्याच्या या धडाकेबाज खेळीने सर्व आजी माजी खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेटचा देव म्हणून ओळखला जाणारा सचिन तेंडुलकरने वैभवच्या खेळीवर ट्विट केले की '' वैभवची निडर शैली, उत्कृष्ट बॅट स्पीड, चेंडूची लांबी पटकन ओळखण्याची क्षमता आणि चेंडूच्या मागे ताकद लावण्याची तयारी, या सर्वांचा संगम त्याच्या धमाकेदार खेळीमागे होता. ३८ चेंडूत १०१ धावा जबरदस्त कामगिरी. जबरदस्त खेळ....!'' केवळ सचिन तेंडुलकरच नव्हे तर अनेक दिग्गज खेळाडूंनी त्याच्या कौतुकाचे इमले बांधले. केवळ खेळाडूच नव्हे तर क्रिकेट प्रेमींनीही त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेट प्रेमींनी त्याच्या या खेळीचे व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर शेअर करत त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. मीडिया तर त्याच्यावर फिदाच झाली. त्याच्या या खेळीने त्याने आपण भारताचे भविष्य आहोत हे दाखवून दिले आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे त्याने लहान वयातच आपण कोण होणार हे दाखवून दिले आहे. त्याच्या या लाजवाब खेळीने त्याच्यावर अचानक प्रसिद्धीचा झोत आला आहे. वैभवने मात्र या झगमगाटाकडे दुर्लक्ष करून खेळावर लक्ष केंद्रित करायला हवे. त्याला आणखी यशोशिखरे गाठायची असेल तर त्याने झगमगाटापासून दूर राहिलेलेच बरे. प्रसिद्धीच्या झगमगाटात वाहत जाऊन आपल्या करिअरचे मातेरे करणारे अनेक खेळाडू आपण पाहिले आहेत. विनोद कांबळी, पृथ्वी शॉ ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. वैभवने आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून आणखी मेहनत केल्यास तो भारतीय क्रिकेटचे भविष्य ठरेल यात शंका नाही. वैभवला खूप खूप शुभेच्छा !

# अखेर राहुल गांधी यांच्या मागणीला यश कोरपणा शहरात अभिनंदन

दैनिक आपला विदर्भ

■ मनोज गोरे

**कोरपणा :** जाती जनगणना करण्याकरिता काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी आपला बुलंद आवाज करीत भाजप सरकारला जेरीज आणले सतत हा प्रश्न संसदेत मांडून भाजप सरकारला जातीय जनगणना करण्यात भाग पाडले अखेर राहुल गांधी यांच्या या मागणीला यश आले. देशाचे पंतप्रधान यांनी दखल घेऊन जातीय जनगणना करण्याचे निर्देश जाहीर केले राहुल गांधी यांच्या मागणीला यश आल्याबद्दल व जनगणना जातीय करण्यास सरकारला भाग पाडले अशा या नेता राहुल गांधी यांचे अभिनंदन करण्याकरिता कोरपणा बस स्थानक चौकात काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते यांनी मोठ्या जल्लोषात राहुल गांधी यांचे अभिनंदन केले. जातीय जनगणना या प्रश्नाना न्याय मिळवून देण्याकरिता सतत लढा तेवत ठेवणारे राहुल गांधी सामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी लढणारे राहुल गांधी यांचे मोठ्या जल्लोषात अभिनंदन केले आहेत यावेळी भारतीय काँग्रेस पक्षाचे चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्ष विजय बावणे कोरपना तालुका अध्यक्ष उत्तमराव पेचे,श्याम भाऊ रणदिवे,संभाजी कोवे, भाऊजी पाटील चव्हाण,




गणेश गोडे, संजय जाधव, विलास आडे, भाऊराव पाटील बोरडे, वहाब भाई,उत्तम आत्राम,अनिल गोंडे, बापूराव आत्राम, विलास हरबळे, देविदास तुरानकर आदी शेकडो कार्यकर्ते या जल्लोषात सामील झाले

## दोन मोटार सायकलच्या धडकेत एक जण मृत्यू तर दोन जण जखमी

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी** दोन मोटार सायकलच्या अपघातात एक जण मृत्यू त्तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना तालुक्यातील बिटरगाव बु येथील पुलाजवळील सती माय मंदिरा जवळ घडली . यात एकाचा जागीच मृत्यू तर दोघे गंभीर जखमी झाले आहे . या अपघातात बजरंग लखन सिंग बरदावळ (२५) याचा मृत्यू झाला असून सुभाष लक्ष्मण देवकर व देवानंद मनदुमलेवाड गंभीर जखमी असून त्यांना ढाणकी येथील प्रा. आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले होते.

मृतक लखनसिंग बरदावळ यांच्या काकाला त्यांचा पुतन्या नामे- बजरंग लखनसिंग बरदावळ वय अं-२५ वर्षे यांची मृत्यु झाल्याची माहीती मिळाल्यावर त्यांनी बिटरगाव पोलीस स्टेशन येथे समोरून येणाऱ्या मोटार सायकल क्रंमाक एम एच-२२/८८३१ चेसीस क्रं-(00G20C03255) चे मोटर सायकल चालकांने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजी पणाने चालवून ठोस मारून अपघात झाल्याने डोक्याला व शरिराला जबर दुखापत झाल्याने त्याच्या पुतन्याचा अपघातात मूत्यु झाला त्याचे मृत्युस नमुद मोटार सायकल चालक हा कारणीभूत असल्याने त्याचे विरूद्ध कायदेशीर कार्यवाही होणे करिता त्यांनी जबानी रिपोर्ट दिले आहे .

## दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ ढाणकी शहर कडकडीत बंद




दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** २२ एप्रिल ला पहलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्याच्या निषेधार्थ ढाणकी शहर बंद ला सर्व पक्षीयकडून आव्हान करण्यात आला होता. या बंद ला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सर्व पक्षीय अधिकारी,व्यापारी यांनी आपले प्रतिष्ठान बंद ठेऊन व नागरिकांनकडून पोलीस बंदोबस्त मध्ये ढाणकी शहर शांततेत कडकडीत बंद होते .

## वडिलानेच केली मुलाची हत्या

### सवड येथील आत्महत्येचे प्रकरण

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :**मुलाच्या सतत दारू पिऊन घरात धिंगाणा घलणे, घरी आई-वडिलांना मारहाण करणे व नेहमी त्रास देणे या बाबीला कंटाळून वडिलांनीच आपल्या मुलाची हत्या केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. रिसोड तालुक्यातील सवड येथे दिनांक २३ एप्रिल रोजी दुपारी एक वाजता च्या दरम्यान सवड शेत शिवारामध्ये लिंबाच्या झाडाला गळफास लावलेल्या अवस्थेत विशाल लक्ष्मण कोल्हे वय ३० वर्ष याचा मृतदेह आढळून आला होता. यावर विशालने आत्महत्या केल्याचे पोलिसांनी मर्ग दाखल केले होते. मात्र सदर ही आत्महत्या नसून हत्या होती. याप्रकरणी मृतक विशाल चे वडिल लक्ष्मण कोल्हे वय ५५ वर्षे यांना दि.३ मे रोजी अटक करण्यात आली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार लक्ष्मण नारायण कोल्हे वय ५५ वर्षे राहणार सवड यांचा मुलगा विशाल लक्ष्मण कोल्हे हा नेहमी दारूच्या नशेत राहायचा व यातच तो आई-वडिलांना मारहाण करायचा व घरच्या अन्य सदस्यांना नेहमी त्रास द्यायचा. नेहमी नेहमी होणाऱ्या या त्रासाला कंटाळून अखेर लक्ष्मण नारायण कोल्हे यांनी आपला मुलगा विशाल यास दिनांक २३ एप्रिल रोजी गळफास देऊन त्याची हत्या केली असे तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर नागरे यांच्या फिर्यादीनुसार कलम १०३ (१) नुसार गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करुन पुढील तपास ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले करीत आहेत.

## तो आरोपी अट्टल गुन्हेगार; १० लाखांचा मुद्देमाल जप्त, शेगाव शहर पोलिसांची भरीव कामगिरी

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेगाव शहरात भरदिवसा दोन ठिकाणी घरफोडीचा प्रयत्न झाला होता. मात्र, नागरिकांच्या सतर्कतेने तो फसला. यावेळी एका चोरट्याला पकडून अटक करण्यात आली होती. या प्रकरणातील आरोपी अट्टल गुन्हेगार असून, त्याच्याकडून विविध गुन्ह्यांतील ९ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात शेगाव पोलिसांना यश आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीने अनेक चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

खामगाव रस्त्यावरील विद्यानगर भागात २८ एप्रिल रोजी दुपारी सुमारे ३ वाजता घरफोडीचा प्रयत्न उघडकीस आला होता. याप्रकरणी कमलसिंग किरतसिंग परिहार (रा. विद्यानगर, शेगाव) यांनी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी शेख अहमद शेख समद (रा. आरास ले-आउट, बुलढाणा) व त्याचा साथीदाराने त्यांच्या घराचे व शेजारील देवलाल ढगे यांच्या घराचे कुलूप तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला होता. दोघेही आरोपी कारमधून (क्र. एमएच २८ बीएच १२०५) पळून जात असताना त्यांचे वाहन कडुनिंबाच्या झाडाला धडकले. यावेळी पोलिसांनी तत्काळ धाव घेत एक आरोपी पकडला. मात्र, दुसरा पसार झाला. शेख अहमद याला ताब्यात घेऊन पोलिसांनी चौकशी केली. यावेळी त्याने व त्याचा फरार साथीदार सय्यद शकील सय्यद युसुफ (रा. इकबाल चौक, बुलढाणा) याने शेगाव पोलिस स्टेशनच्या हद्दीत चोरी केल्याची कबुली पोलिसांना दिली. पोलिसांनी मुद्देमाल जप्त करून चोरीच्या घटनेत वापरलेली कार, दोन नंबर प्लेट, दोन लोखंडी रॉड, तुटलेली कुलपे, १५ हजार रोख, विविध घरफोडी गुन्ह्यातील एकूण ९ लाख ८६ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# वाशिम येथे कुराश खेळाडू प्रशिक्षण शिबीर

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** कुराश असोसिएशन ऑफ महाराष्ट्र संलग्न वाशीम जिल्हा कुराश असोसिएशनच्या वतीने शुक्रवार १२ ते १४ मे दरम्यान तीन दिवसीय कुराश खेळाडू प्रशिक्षण शिबीर वाशिम येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजीत करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये कुराश खेळाडू प्रशिक्षण,पंच प्रशिक्षण ,कोच प्रशिक्षण आयोजित केले आहे. या शिबिरात वाशीम जिल्ह्यातील कारंजा, मंगरुळपीर, मानोरा, मालेगाव, रिसोड तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील खेळाडू, पंच व कोच सहभागी होऊ शकतात.या प्रशिक्षणा मध्ये ९ वर्ष ते ४५ वर्ष वयोगटातील खेळाडू सहभागी होऊ शकतात. वाशीम जिल्ह्यातील सर्व क्रीडा शिक्षक,पंच प्रशिक्षण घेऊ शकतात. जेणे करून ते शालेय खेळा मध्ये आपल्या शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करू शकतील. कुराश खेळ हा उझबेकस्तान मधील एक पारंपारिक मार्शल आर्ट आहे.

जो कुस्तीचा एक प्रकार आहे. या खेळात खेळाडूंना एकमेकांना खाली फेकण्याचा प्रयत्न करायचा असतो.पण शरीर आणि पायांचा उपयोग करता येत नाही. कुराश हा कुस्तीचा एक प्रकार आहे.ज्यात शरीराचा खालचा भाग (पाय) वापरता येत नाही. या मध्ये खेळाडू एकमेकांना जमिनीवर फेकण्याचा प्रयत्न करीत असतात. या खेळा मध्ये शरीराचा खालचा भाग (पाय) पकडणे किंवा मारणे यासाठी वापरता येत नाही. खांद्या, कंबर, किंवा मानेवर पकडणे किंवा मारणे यासाठी वापरले जाऊ शकते.पाठीवर फेकून विजय मिळवता येतो.तर बाजूला फेकल्यास गुण मिळतात. पोटावर किंवा कमजोर बाजूला फेकल्यास कमी गुण मिळतात. सर्वाधिक गुण मिळवणारा खेळाडू जिंकतो. १९२८ मध्ये कझान येथे पहिली अधिकृत कुराश चॅम्पियनशिप झाली सन २००७ मध्ये आशियाई इनडोअर गेम्समध्ये कुराशचा समावेश करण्यात आला. ऑल्यांपिक काऊन्सिल ऑफ नुसार कुराश या खेळाची फार मोठी लोकप्रियता आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने कुराशमध्ये अनेक पदके जिंकली आहेत. कुराश खेळाचे खुप फायदे आहेत. शारीरिक क्षमता वाढवने, शरीराचे आत्मनियंत्रण आणि ताण व्यवस्थापनाला मदत करते.आत्मविश्वास वाढवते. कुराश हा एक मनोरंजक आणि शारीरिकदृष्ट्या फायदेशीर खेळ आहे.त्याच कारणाने मध्य आशिया मध्ये लोकप्रिय आहे.

राज्य शासनाचा सरळ सेवा भरती मध्ये या खेळाला आरक्षण असल्याने खेळाडूला सरकारी नोकरी मध्ये ५% आरक्षणाचा लाभ मिळतो. या शिबिराचा जास्तीत जास्त खेळाडूंनी लाभ घ्यावा असे आवाहन संघटनेचा वतीने करण्यात आले आहे. अधिक महिती व नाव नोंदणीसाठी संघटनेचे अध्यक्ष प्रा.अनिल बोंडे सचिव राजेंद्र सौदागर यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन आयोजका कडून करण्यात आले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी जुईनगर यार्डातील नवीन जंक्शन पॉइंटची केली पाहणी



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील हार्बर मार्गावरील जुईनगर यार्ड येथे बांधण्यात येत असलेल्या नवीन जंक्शन पॉइंटची केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पाहणी केली. यावेळी रेल्वे अभियंत्यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना जंक्शन पॉइंटच्या कामकाजाची माहिती दिली. नवी मुंबईतील जुईनगर रेल्वे यार्ड येथून नवीन गाड्या सुरू करण्याचे काम वेगाने सुरू असून, याचा आढावा घेण्यात आला.

### ओटीटी प्लॅटफॉर्मवर बंदी आणली पाहिजे खासदार नरेश म्हस्के यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** अश्लीलतेचा कळस गाठणाऱ्या ओटीटी प्लॅटफॉर्मर शासनाने बंदी घालावी, अशी मागणी खासदार नरेश मस्के यांनी माध्यमांशी बोलताना केली.



यावेळी ते म्हणाले की, ओटीटी प्लॅटफॉर्म बंदी घातली पाहिजे. अश्लीलतेचा कळस या लोकांनी गाठलेला आहे. ओटीटी प्लॅटफॉर्मवर्स वेगवेगळ्या साईट्स द्वारे अश्लील गोष्टी दाखवत आहेत. हे भरतीत संस्कृतीला मान्य नाही आहे. स्वातंत्र्याच्या नावावर काहीही अश्लीलतेचा कळस त्यांनी गाठलेला आहे.मी मागच्या काळात संसदेत मागणी केली होती. या ओटीटी प्लॅटफॉर्मवर्स मोठी बंदी आणली पाहिजे. त्यावर सेन्सरशिप लावली पाहिजे. काही साईट्स सरकारने आणि शासनाने बंद केलेले आहे. आपल्या मागणीनंतर आता पुन्हा एकदा ओटीटी प्लॅटफॉर्मवर आता सेन्सरशिप पाहिजे. ही मागणी उचलली गेली आहे.अशा अश्लीलतेचा जे काही साईट्स आहे.त्यावर कारवाई करणं गरजेचे आहे. असे मत खासदार नरेश म्हस्के यांनी व्यक्त केले.

### शेतकऱ्यांचे अतिवृष्टीचे अनुदान ज्या अधिकाऱ्यांनी लुटले त्यांची बाहेर तालुक्यातील अधिकारी चौकशी करणार - पंकजा मुंडे




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** आज जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे या जालना जिल्ह्या दौऱ्यावर आले असता त्यांनी जालना जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये सभागृहात आढावा बैठक घेतली, यामध्ये त्यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीक पाणी व टंचाईच्या विविध मुद्द्यावर विशेष करून ही बैठक घेतली आहे. या बैठकीमध्ये त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना दिली आहे व शेतकऱ्यांना कुठल्याही आणि अडचणीला सामोरे जायचं काम पडलं नाही पाहिजे अशा सूचना सुद्धा यावेळी त्यांनी दिल्या आहेत प्रामुख्याने येणाऱ्या खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना मुबलक दरात बी बियाणे खते उपलब्ध करून द्या तसेच शेतकऱ्यांच्या अडीअडचणीवर विशेष करून लक्ष द्यावे अशा सूचना यावेळी यांनी जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना दिला आहे या बैठकीला जिल्ह्यातील सर्व आमदार पदाधिकारी कार्यकर्ते हे आवर्जून उपस्थित झाले होते या बैठकीमध्ये त्यांनी बऱ्याच उद्द्यांवर हात घालत शेतकऱ्यांच्या अडीअडचणी लवकरच दूर केल्या जाईल अशी ग्वाही यावेळी दिली आहे.

तसेच जिल्ह्यात शेतकऱ्यांचे अतिवृष्टीचे ५७ कोटी रुपयांचे अनुदान काही अधिकाऱ्यांनी लुटले आहे त्यांनी परस्पर ते आपल्या खात्यात पळवले आहे हे चुकीच आहे या संदर्भात माझ्याकडे तक्रारी प्राप्त झाले असून या तक्रारीचे चौकशी करण्यासाठी मी बाहेर तालुक्यातून अधिकारी बोलून याची चौकशी करणार आहे जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर मी योग्य ती कारवाई करणार असल्याची माहिती सुद्धा यावेळी त्यांनी दिली आहे. याप्रसंगी जालना जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आमदार नारायण कुचे आमदार संतोष पाटील दानवे आमदार राजेश राठोड आमदार अर्जुन खोतकर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# माझ्या आयुष्यात दोन ते तीन वेळा मुख्यमंत्री बनण्याचा योग येऊन गेला : छगन भुजबळ

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** माझ्या आयुष्यातील दोन ते तीन वेळा मुख्यमंत्री बनण्याचा योग्य होता तो गेला. काँग्रेस मधून जाताना देखील तुम्ही जाऊ नका तुम्हाला मुख्यमंत्री करतो असे सांगितले होते. तरी पण मी शरद पवार यांच्या सोबत गेलो. सगळ्यांनी इच्छा धरायला हरकत नाही. राजकारणात सगळेजण अपेक्षा घेऊन येतात, मेहनत करा योग्य वेळ येईल, व सन्मानही होईल, असे मत माजी मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

महात्मा फुले समता परिषद निर्माण झाल्यानंतर आम्ही अनेक मुद्द्यावर रॅली केल्या आहेत. संपूर्ण देशात या रॅली झाल्या त्यात आमची पहिली मागणी होती की



जातनिहाय जनगणना करावी.स्वातंत्र्य मिळाल्यावर जनगणना झाली. मात्र, जातनिहाय जनगणना झाली नाही.५२ टक्के ओबीसी समाज आहे. म्हणून आम्हाला २७ टक्के आरक्षण मिळाले. कोर्टात जाऊन अनेकजण यांची संख्या किती आहे असे प्रश्न उपस्थित करण्यात केले. शिक्षण, नोकरी आणि राजकारण यासाठी आरक्षण आहे. यासाठी आमची लढाई सुरू होती. नरेंद्र मोदी यांच्या सरकारने शेवटी हा निर्णय घेतला आम्ही त्यांचे आभार मानतो. जनगणना मुळे निवडणुका लांबणार असे मला वाटत नाही. संजय राऊत म्हणाले ते बरोबर आहे.माझ्या आयुष्यातील दोन ते तीन वेळा योग्य होता तो गेला. काँग्रेस मधून जाताना देखील तुम्ही जाऊ नका तुम्हाला मुख्यमंत्री करतो असे सांगितले होते. तरी पण मी शरद पवार यांच्या सोबत गेलो.सगळ्यांनी इच्छा धरायला हरकत नाही. राजकारणात सगळेजण अपेक्षा घेऊन येतात, मेहनत करा योग्य वेळ येईल. काश्मीरचे मुख्यमंत्री काय म्हणाले ते पहा.श्रीनगर पासून पहलगाम पर्यंत आम्ही हिंदुस्तानी आहोत असे मोर्चा निघाले.शरद पवार यांचा आयुष्य राजकारणात गेलं आहे.संरक्षण मंत्री म्हणून त्यांनी काम केले आहे.कुणाचं कधी राजीनामा मागायचा त्यांना हे माहिती आहे.सरकारच्या पाठीशी उभे राहण्याचं म्हणजे सैन्याच्या मागे उभं राहणं असा अर्थ होतो.दलित आणि आदिवासी यांच्यासाठी वेगळे फंड असतात. इकडून तिकडून गोळा करून पूर्तता करण्यात येत आहे. हळूहळू जसा राज्याचा उत्पन्न वाढेल तेव्हा लाडकी बहीण योजनेसाठी स्वतंत्र फंड उभा राहील.देशासमोर एकच प्रश्न आहे. पहलगाम हल्ला विरोधात काय कारवाई करणार आहोत. शहरात अधिकारी काम करतात पालकमंत्री नसल्यामुळे नाशिक जिल्ह्याचे नाव आले नाही अस मला वाटत नाही. काही अधिकारी काम करत नाहीत आणि काहींना तरी त्यांचे कर्तव्य माहितीच नाही.

असे अधिकारी इथे आणून बसवले आहेत.१७ हजार कोटी रुपयांचे आराखडा तयार केला कोण देणार एवढे पैसे.आता रिंग रोड करणार असे सांगतायत २ वर्ष राहिले आहेत फक्त कुंभसाठी, गोदावरी नदी स्वच्छ करावी इतके काम तरी मनपाने करावे, असे मत माजी मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले.

### 'तिच्या आई-वडिलांनी माझा संसार मोडला!' घटस्फोटावर संजूबाबांचा धक्कादायक खुलासा

**मुंबई/प्रतिनिधी :**बॉलिवूड अभिनेता संजय दत्त कायमच आपल्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत राहिला आहे. तिनदा विवाहबद्ध झालेल्या संजूबाबाने पहिलं लग्न १९८७ मध्ये अभिनेत्री ऋचा शर्मा हिच्यासोबत केलं होतं. त्यांच्या लग्नानंतर एका वर्षातच दोघांना कन्यारत्न झालं, पण त्यानंतर ऋचाला ब्रेन ट्यूमर झाल्याचं निदान झालं आणि दोघांच्या नात्यात तणाव सुरू झाला. संजय आणि ऋचाचा घटस्फोट का झाला यावर अनेक तर्क लावले गेले. काहींनी आरोप केला की संजयने ऋचाच्या आजारामुळे तिला सोडलं. मात्र आता संजय दत्तने एका जुन्या मुलाखतीत स्वतःवरील सर्व आरोप फेटाळले आहेत आणि घटस्फोटामागील कारणांबाबत थेट भाष्य केलं आहे.संजय दत्त म्हणाला, ''हे आरोप निराधार आहेत. मी ऋचावर प्रेम करत होतो आणि तिच्या कठीण काळात तिला धैर्य दिलं. मी तिला कधीही एकटी सोडलं नाही. या गोष्टी फक्त माझ्या बदनामीसाठी पसरवल्या गेल्या.'' संजूने पुढे सांगितलं, ''आमच्या नात्यात तिच्या आई-वडिलांचा सतत हस्तक्षेप असायचा. त्यांनी माझ्यावर अनेक आरोप लावले. त्या हस्तक्षेपामुळेच आमचं नातं बिघडलं. फक्त तिचे आई-वडीलच नाही, तर बहिणीसुद्धा आमच्यात पडायची. नवरा-बायकोच्या नात्यात तिसऱ्यांचं स्थान नसतं.''

## अवैद्य रेतीच्या वाहनावर तहसीलदार तेजनकर यांची कारवाई १ लाख ८० हजार दंड ठोठावला



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील महसूल प्रशासनाच्या वतीने तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या नेतृत्वात रेतीची अवैद्य वाहतूक करणाऱ्या वाहनावर १ मे च्या रात्री बारा वाजता कारवाई करण्यात आली.


मिळालेल्या प्राप्त माहितीनुसार, रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना १ मे च्या रात्री साडेअकरा वाजता गुप्त माहिती मिळाली की, लोणी ते रिसोड मार्गावरील भर जहागीर येथील आसरा माता मंदिरा दरम्यान असलेल्या रस्त्यावर एका ट्रक मधून रेतीची अवैध वाहतूक करण्यात येत आहे. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी महसूल प्रशासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यासह १ मे च्या रात्री बारा वाजता मिळालेल्या गुप्त माहितीप्रमाणे घटनास्थळी दाखल होऊन घटनास्थळी उभ्या असलेल्या ट्रकची पाहणी केली असता ट्रक क्रमांक एमएच ३७ टी ९९८९ मध्ये चार ब्रास रेती असल्याचे आढळून आले. सदर रेतीबाबत ट्रकचालक रामेश्वर वामन राठोड राहणार देवठाणा तालुका मंठा यांना विचारणा केली असता त्याच्याजवळ रेतीच्या वाहतुकीच्या परवान्याबाबत कोणतेही कागदपत्रे आढळून न आल्याने रेतीचे अवैध वाहतूक करीत असल्याचे निष्पन्न झाले. सदर ट्रकचा घटनास्थळी पंचनामा करून १ लाख ८० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून चार ब्रासच्या रेतीसह ट्रक रिसोड येथील पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आला आहे. रेतीची अवैध वाहतूक करणारा सदर ट्रक हा दिलीप राऊत लाखाला,वाशिम यांचा असल्याचे समजते. सदरची कारवाई रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या नेतृत्वात मंडळ अधिकारी एस.एम. पडवे, सुनील लोखंडे, पटवारी स्वप्निल धांडे,जि.जि. गरकळ, लखन उसारे, महसूल सेवक मुधोळकर यांच्या पथकाने केली. सदरच्या कारवाईने रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनधारकासह रेती तस्करांमध्ये एकच खळबळ उडाली आहें.

## लाडकी बहीण योजनेमुळे सर्वच खात्यांना निधीच्या बाबतीत कसरत करावी लागत आहे- प्रकाश आबिटकर

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महात्मा फुले आरोग्यदायी योजनेमध्ये काही महत्त्वाचे बदल आम्ही केले आहेत. त्याची अंमलबजावणी आता सुरू झाली आहे. पुढील एक महिन्यांमध्ये या योजनेतील आर्थिक मदतीमध्ये वाढ केली जाणार आहे. या योजनेत एकही रुपया पेशंटकडून घ्यायचा नाही. मात्र दुर्दैवाने काही हॉस्पिटल पेशंट कडून पैसे घेत असल्याचं समोर आलं आहे. तशा काही तक्रारी आल्या होत्या.अशा तक्रारीवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. लाडकी बहीण योजनेमुळे सर्वच खात्यांना निधीच्या बाबतीत कसरत करावी लागत आहे.असे मत आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते पुढे म्हणाले की, कोल्हापूर मध्ये चार हॉस्पिटलवर अशी कारवाई झाली आहे. आता राज्यात देखील ही कारवाई सुरू होईल.शासनाच्या यंत्रणेने योग्य नियंत्रण ठेवलं तर आपोआप हॉस्पिटल चांगलं काम करावे



लागेल. गेल्या पाच वर्षात १००७ तक्रारी या योजना संदर्भात आणि हॉस्पिटल संदर्भात आल्या होत्या. आता हॉस्पिटल मधील बेडची उपलब्धता मोबाईल ॲप द्वारे देखील लोकांना मिळणार आहेत. शिवाय हॉस्पिटल बाबतची तक्रार देखील ऑनलाइन पद्धतीने नातेवाईकाला देता येणार आहे. आता पेशंट किंवा नातेवाईकांकडून ऑनलाईन आलेली तक्रार थेट आरोग्य विभागाला येईल.चांगला विषय त्यांनी घेतला आहे असे विषय घेतले पाहिजेत.अजित पवार मुख्यमंत्री इच्छा ही व्यक्त करणे काही चुकीचे नाही. राजकारणात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपण मुख्यमंत्री व्हावं असं वाटते. अजित पवार तर त्या पक्षाचे नेते आहेत. त्यांना असं वाटणं यात गैर काहीच नाही. पंचगंगा प्रदूषणाचा प्रश्न गंभीर आहेच. प्रदूषण थांबवण्यासाठी नमामी पंचगंगा योजनेच्या आराखड्याची आणि निधीची तरतूद होईल. त्यामुळे आता या आराखड्याच्या कामाची सुरुवात होणे गरजेचे आहे. केवळ कागदावर नाही तर हे काम आता प्रत्यक्षात सुरू होण्यासाठी आम्ही लोकप्रतिनिधी आणि पालकमंत्री म्हणून स्वतः यामध्ये लक्ष घालणार आहोत. अलमट्टीच्या उंची वाढवण्याला महाराष्ट्र राज्य सरकारचा विरोध आहे. हे आपण केंद्राकडे स्पष्टपणे सांगितलं आहे. अलमट्टी मुळे सांगली आणि कोल्हापूरला सर्वाधिक फटका बसणार आहे.

जर कर्नाटक सरकार अशा पद्धतीने वकील आणि जलतज्ञांची फौज उभा करत असेल.तर, आम्ही देखील त्या विरोधात तशीच वकिलांची आणि जलतज्ञांची फौज उभा करू.अलमट्टी उंची वाढी विरोधात कायदेशीर दृष्ट्या जे जे करावे लागेल ते आम्ही करू, असे मत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी यावेळी केले

# शासनाचा आर्थिक नियोजन पूर्णपणे कोलमडलेला आहे : सतेज पाटील

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** लाडकी बहीण बजेट आल्यानंतर साठ टक्के निधी खर्च करा असा पहिला जीआर आला. याचवेळी बजेटला कात्री लागली आहे. सरकारला लाडकी बहीण निवडणुकीनंतर सावत्र झाली आहे. अद्याप एप्रिल महिन्याचे पैसे मिळालेले नाहीत. २१०० स्वप्न अद्याप स्वप्नच आहे. असा आरोप सतेज पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सरकारवर केला. यावेळी ते म्हणाले की, आता तर सामाजिक न्याय विभागाचे मंत्रीच म्हणत आहेत माझा विभाग बंद करा. एवढ मोठ वक्तव्य मंत्रीच करत असतील तर घडी किती विस्कटली आहे हे महाराष्ट्राला दिसत आहे. निवडणुकीपूर्वी या सगळ्या योजनांची घोषणा करताना तुम्ही विचार केला नाही का की, या सगळ्याची आर्थिक नियोजन ही कराव लागत. केवळ मत घेण्यासाठी या घोषणा झाल्या होत्या ते दिसून येत आहे. अजित पवार उपमुख्यमंत्री पदावर काम करत आहेत. ती एक सामुदायिक जबाबदारी आहे. जेव्हा एखाद्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे असते तेव्हा हे सामुदायिक आहे असे तिघे म्हणतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं होतं आमच्या सरकार आल्यानंतर कर्जमाफी करू ते व्हिडिओ आम्ही पुन्हा दाखवत आहोत.तुम्ही बोलला होता आणि ते करा, मी बोललो नाही म्हणजे माझी जबाबदारी नाही असं त्यांच्या वक्तव्यावरून दिसून येत आहेत. कर्जमाफीसाठी तुम्ही निवडणुकांची वाट बघत आहात का? असे असेल तर विधानसभा बरखास्त करा निवडणुका लावा आणि कर्जमाफी करा, त्यांनी जाहीर करावं शेतकऱ्यांच्या अडचणीसाठी नाहीतर निवडणुकांसाठी ही मदत आहे.नेमकं लोकांना काय केलं हे महत्त्वाच आहे.शेतकऱ्यांचे, लोकांचे प्रश्न आज देखील तोंड आव वासून उभे आहेत. स्वतः सर्वेकडून स्वतःची पाठ थोपटून घेणे याला काही अर्थ नाही. पाच वर्ष राहुल गांधी जातीय जनगणनेसाठी मागणी करत आहेत. ज्याची जेवढी संख्या आहे तेवढे त्याला भागीदारी मिळाला पाहिजे, अशी राहुल गांधी यांची भूमिका



आहे. यामुळे देशाचे आणि महाराष्ट्राचे चित्र बदलले आहे.यामुळे मराठा आरक्षणाला देखील चालना मिळू शकेल. स्थानिक स्वराज्य निवडणुका सुप्रीम कोर्टातील तारीख पुढे गेल्या आहेत.त्यामुळे दिवाळीपर्यंत निवडणुका होतील अशी अपेक्षा आम्हाला आहे. शक्तिपीठ बाबत संजय बाबा यांची भूमिका अद्याप ठाम आहे. पुढच्या राजकीय विकासासाठी त्यांनी भाजपची वाढ झालेली असेल.

दादाचा स्वभाव आम्हाला माहित आहे ते ताबडतोब बाहेर होतात मात्र त्यांनी शेतकऱ्यांची बाजू समजून घेतली पाहिजे. शक्तिपीठ महामार्गासंदर्भात राज्यातली ऑनलाईन बैठक आम्ही घेत आहेत. प्रत्येक ठिकाणाहून त्याला विरोध होत आहे.तर शासन इतका का ठाम आहेत. धनगर समाजाने समजून घ्यायला हवा की आपली फसवणूक झाली आहे.त्याचं उत्तर धनगर समाजाला देणं अभिप्रेत आहे.असे मत आमदार सतेज पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले

# मेहकर नगर परिषदेचे रेकॉर्ड रूम जळून खाक



## आगीचा घात की अपघात : लाख मोलाची कागदपत्रे सुरक्षा विना

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : येथील नगर परिषदेची अतिक्रमण विरोधी कारवाई चर्चेत असतानाच आता एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. मेहकर नगर परिषद कार्यालयाला ३ मेच्या पहाटे भीषण आग लागली. या आगीत नगर परिषदेची रेकॉर्ड रूम जळून खाक झाली आहे. त्यामुळे या आगीबाबत शंका कु शंका उपस्थित केली जात असून हा घात की अपघात असा प्रश्न उपस्थित होत आहे. नगरपरिषदेकडे संपूर्ण शहरातील शासकीय कामकाज तसेच लाख मोलाची प्रॉपर्टी चे दस्त असताना ही सर्व कागदपत्रे असुरक्षित ठेवल्या गेल्याने नगरपरिषदेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. एकीकडे अतिक्रमण हटाव मोहीम चर्चेत असतानाच दुसरीकडे रेकॉर्ड रूम जळून खाक झाल्याने याबाबत चर्चेचे गुराळ उठले आहेत.**

मेहकर नगरपरिषद कार्यालयाच्या नुतनीकरणाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. दरम्यान ३ मे रोजी पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास रेकॉर्ड रूमला अचानक आग लागली. या आगीत नगर परिषदेच्या कामकाजासंबंधीत अतिशय महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली आहे. शॉट सर्किटने ही आग लागल्याचे सांगितल्या जात असले तरी, आगीचे अद्याप नेमके कारण समोर आलेले नाही. स्थानिकांनी आग विझविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र, आग नियंत्रणात येत नव्हती. मेहकर नगरपालिकेच्या अग्निशामक वाहनात तांत्रिक बिघाड झाल्याने वाहन दुरुस्तीसाठी दुसऱ्या जिल्ह्यात आहे. त्यामुळे लोणार नगरपालिकेच्या अग्निशामक दलाने घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवले आहे. मात्र, नगर परिषदेच्या रेकॉर्ड रूम मधील सर्वच महत्वाची कागदपत्रे खाक झाली आहेत. याआधी ३१ मार्च २०२२ रोजी मेहकर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाला देखील आग लागली होती. त्यावेळी देखील सर्व महत्त्वाची कागदपत्रे जळालेली होती. आता नगरपरिषद कार्यालयातील रेकॉर्ड रूम जळाल्याने वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले आहे. काही वर्षांपूर्वी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाला लागलेल्या आगी नंतर तरी नगर परिषद प्रशासनाने दखल घेत आपली कागदपत्रे सुरक्षित करण्याची गरज असताना याकडे मात्र नगर परिषद प्रशासनाने अक्षम्य दुर्लक्ष केल्याने व एकंदरीत घटनाक्रम पाहता याबाबत शंका निर्माण होत असून नगरपरिषदेला लागलेली आग ही घात आहे की अपघात असा प्रश्न उपस्थित केल्या जात आहे.

### महत्त्वाची दस्तऐवज प्रशासनाकडे उपलब्ध मुख्याधिकारी कापरे यांची माहिती



नगरपरिषदेच्या अभिलेख कार्यालयाला सकाळी लागलेल्या आगीत सन १९३० च्या दरम्यानची कागदपत्रे जळून खाक झाली आहेत. मात्र, इतर जन्मा – मृत्यूच्या नोंदी तसेच इतर महत्त्वाची कागदपत्रे डिजिटल डायजेशन झाल्यामुळे नगरपरिषद प्रशासनाकडे ऑनलाईन उपलब्ध आहेत. आगीमध्ये लोकांचे अर्ज, तक्रार या संदर्भात प्राप्त झालेल्या अर्जाची ३१ मार्च ला ऑडिट झाल्यानंतर संबंधित विभागाची गट्टे करून जमा करण्यात आली होती. सदर दस्त नवीन ठिकाणी हलवून कळविण्याचे नियोजनही करण्यात आले होते.मात्र, नवीन ठिकाणी हलवण्यापूर्वीच आग लागून सर्वदस्त खाक झाले आहेत. मात्र, नगर परिषदेकडे महत्त्वाची दस्तऐवज उपलब्ध असून बुलढाणा येथील कार्यालयातही तसेच ऑनलाइन उपलब्ध असल्याने असल्याची माहिती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कापरे यांनी दिली.

### मुख्याधिकारी कापरे यांना ताब्यात घेऊन सीआयडी चौकशी करा



मेहकर नगर परिषदेच्या रेकॉर्ड रूमला ३ मे रोजी सकाळी सकाळी आग लागली. या आगीमध्ये संपूर्ण रेकॉर्ड जळून खाक झाली आहे. सदर आग ही नगर परिषद मुख्याधिकारी कापरे यांनी लावली असून जनतेकडूनही नगर परिषद मुख्याधिकारी कापरे यांच्यावर शंका घेतली जात आहे.नगर परिषदेचे मुख्याधिकारी कापरे यांचा प्रचंड मोठे गौडबंगाल असून प्रशासनाने मेहकर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी कापरे यांना ताब्यात घेऊन त्यांची सीआयडी चौकशी करावी, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी केली आहे.

## गाडीच्या वादा वरून मित्राने मित्राला भोकसले, नागपुरातील पारडी पोलीस स्टेशन हद्दीतील घटना



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** पारडीतील भांडेवाडी परिसरात शुक्रवारी रात्री एका तरुणाची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आली. मृत व्यक्तीचे नाव सतीश कालीदास मेश्राम असून, तो एकता नगरचा रहिवासी होता. रोजच्या प्रमाणे कामासाठी बाहेर गेलेला सतीश घरी परतलाच नाही, आणि दुसऱ्या दिवशी त्याचा मृतदेह आढळल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांना माहिती मिळताच पारडी पोलिसांनी खुनाचा तपास सुरू केला असून आणि ३ दिवस अगोदर सतीश आणि कुणाल शेंडे यांच गाडीच्या वादावरून भांडण झाल होत अशी माहिती पोलिसांना मिळाली. त्या आधारे पोलिसांनी अमोलला ताब्यात घेऊन चौकशी केली असता अमोल ने सांगितले की मी आणि सतीश दोघेही मित्र होते.काही दिवसांपूर्वी सतीश ने अमोलच्या नातेवाईकांनची गाडी घेतली होती,आणि अमोल गाडी परत मागत होता तरी देखील सतीश गाडी देण्यासाठी टाळा टाळ करत होता, हत्येच्या दिवशी सतीश अमोलच्या घरी जाऊन भांडण करून आला होता, त्याचा राग घेऊन कुणाल ने सतीशला भोकसले अशी माहिती पोलिसांनी दिली.

## गायरान जमिनीला आग गवतासह झाडेझुडपे जळून खाक

### येवता येथील घटना



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यातील येवता येथील गायरान जमिनीला आग लागून या आगीमध्ये ५० एकर मधील झाडा झुडपासह गवत जळून खाक झाल्याची घटना दिनांक २ मे रोजी दुपारी बारा वाजता च्या दरम्यान घडली. घटनेची माहिती रिसोड नगरपरिषद अग्निशमन विभागाला देण्यात आली मात्र कडक ऊन व दुपारची वेळ असल्यामुळे आग झपाट्याने पसरतात चालली होती व आग आटोक्यात आणण्यासाठी गावकऱ्यांनी शर्तीचे प्रयत्न केले मात्र त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. या आगीमध्ये गवतासह हिरवीगार झाडे ही जळुन खाक झाली रिसोड नगर परिषद चे अग्निशमनचे कर्मचारी चालक अझरुद्दीन, संजय पवार हे घटनास्थळी दाखल झाले मात्र आग ज्या ठिकाणी लागली होती त्या ठिकाणापर्यंत वाहन व पाईप पुरत नव्हता शेवटी अथक परिश्रम नंतर सदर आग आटोक्यात आणून पुढील अनर्थ टाळला. सदर आग विझवण्यासाठी येथील सरपंच सुखदेव नवघरे, ग्रामपंचायत सदस्य अनिल रुई, सतीश भांदुर्गे, गजानन देशमुख, गणेश भांदुर्गे, विजय देशमुख, नितीन लोखंडे यांनी मोलाचे सहकार्य केले आग कशामुळे लागली मात्र याबाबत कळू शकले नाही.

# बुलढाणा जिल्ह्यात शेगाव तालुक्यात केस गळती नख, गळती त्यानंतर आता.....!

- रुग्णांना जाणवू लागला प्रचंड थकवा व चिडचिडपणा
- प्रशासनाने आम्हाला वाऱ्यावर सोडल्याची नागरिकांची भावना

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शेगाव, नांदुरा, खामगाव या तालुक्यात गेल्या डिसेंबर महिन्यापासून नागरिकांना अचानक केस गळतीचा त्रास सुरू झाला होता व अनेकांना टक्कल पडलं होते. त्यानंतर दोन ते तीन महिन्यानंतर याच रुग्णांचे नख विदृप होऊन नख गळण्याचे प्रमाणही वाढले. आता याच रुग्णांना थकवा व चिडचिडपणा जाणवत असल्यामुळे परिसरात चिंता वाढली आहे. ज्या केस गळती व नख गळती झालेल्या रुग्णांच्या रक्तांच्या नमुना सेलेनियमचे प्रमाण वाढले होते. अशाच रुग्णांना आता चिडचिडपणा व थकवा येणे अशा तक्रारी समोर आल्याने परिसरात नागरिकांमध्ये पुन्हा एकदा भीतीचे वातावरण पसरले आहे. केस गळतीचा प्रकार समोर आल्यानंतर देशाच्या सर्वोच्च संशोधन संस्थेच्या पथकाने अर्थात आयसीएमआर च्या पथकाने या भागाचा दौरा करून अनेक नमुनेही तपासणीसाठी घेतले होते. मात्र, चार महिने उलटूनही अद्याप या पथकाने अहवाल सादर केला नाही. त्यानंतर नख गळती सुरू झाली व नख गळती नंतरही केंद्राच्या विशेष पथकाने या परिसराचा दौरा केला. मात्र काही दिवसातच या नागरिकांना आता थकवा व चिडचिडपणा जास्त प्रमाणात जाणवू लागल्याने प्रशासनाने या परिसरातील नागरिकांना वाऱ्यावर सोडल्याची भावना नागरिकांमध्ये दिसून येत आहे.

जिल्ह्यातील शेगाव नांदुरा खामगाव या तीन तालुक्यातील गावांमध्ये २९ रुग्ण नखाची समस्या असलेले आढळून आलेले आहेत. सेलेनियमचे वाढते प्रमाण असल्यामुळे हा आजार बळवल्याची प्राथमिक अंदाज आहे.रुग्णांवर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी शेगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात घालवण्यात आले आहेत.अशी माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल बनकर यांनी दिली.

## विविध वृत्त...

### केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष्य आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे ४ मे रोजी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे त्यांच्या दोरा संदर्भातील तपशील याप्रमाणे सकाळी १० वाजता मेहेकर येथून बुलढाण्याकडे प्रस्थान ११ -३० दि विदर्भ को ऑपरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेट नागपुर संस्थेच्या बुलडाणा येथील नविन कार्यलयाचे उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थिती त्यानंतर दुपारी ३ वा किन्ही नाईक येथील गायत्री गो सेवाधाम आणि गो विज्ञान केंद्राच्या वर्धापन दिन कार्यक्रमाला उपस्थिती त्यानंतर सोयीनुसार मेहकरकडे प्रत्थान

### बीडमधील कुख्यात खिडकी गँग धुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे स्थानिक गुन्हे शाखेने बीड जिल्ह्यात कुख्यात असलेल्या खिडकी गँगच्या मुसक्या आवळल्या असून लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. कुख्यात असलेल्या खिडकी गँगमधील पाच सदस्यांना धुळे पोलिसांनी अटक करण्यात आली असून त्यांनी धुळ्यात दोन घरफोड्या केल्याची कबुली दिली आहे. अटकेतील सर्वच आरोपी सराईत असून त्यांच्याविरोधात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये तब्बल २४ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी यावेळी दिली.

धुळे पोलिसांनी शेख अशफाक शेख आसीफ (४५, मोहम्मदीया कॉलनी, आझाद नगर, ता. जि. बीड), आगामीर खान जहाँगिर खान (५८, मोहम्मदिया कॉलनी, तेलगाव नाका, ता. जि. बीड), फिरोज रहेमा शेख (३६, पाण्याच्या टाकीमागे, मु.पो. घोडेगाव, ता. नेवासा), एफाझ शेख अनिस शेख (३६, दत्ता चोरमले हॉटेलजवळ, भाग पिंपळगाव, ता. गेवराई, जि. बीड), शेख कलीम शेख अलीम (३३, दहिफळ, ता.जि. बीड) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. सदर आरोपींनी देवपुर भागातील लक्ष्मी नगर येथील एका घरात नोव्हेंबर २०२४ मध्ये घरफोडी केल्याची कबुली दिली तसेच महिंदळे शिवारातील राजेंद्र नगरात रघुनाथ राजाराम सोनार यांच्याकडे देखील १२ लाख ७८ हजार ८०५ रुपयांचा ऐवज चोरल्याची कबुली दिली आहे.

### वादळी वाऱ्यामुळे घरावरील टिनाचे छत पूर्णता उडाले



दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यात आज दुपारी अचानक वादळी वारा आला आणि या अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे आमगाव तालुक्यातील कट्टीपार येथे श्रावणजी मेंढे यांच्या घरावरील लोखंडी पत्र पूर्ण उडून पडले. आणि घराजवळी असलेला विद्युत खांब पडला त्यामुळे गोढ्यात असलेला एक बैल सुद्धा मरण पावला आणि पूर्णतः घरावरील पत्रे उडाल्यामुळे आता कुठे राहावे असा प्रश्न मेंढे परिवारावर उपस्थित झाला आहे. या वादळी वाऱ्यामुळे मेंढे यांचे मोठे नुकसान झाल्याची दिसून आले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे सरकारने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी आता मेंढे यांनी केली आहे.

### परदेश शिष्यवृत्तीसाठी २० मेपर्यंत अर्ज करण्याची मुदत

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत अनुसूचित जाती, नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशात विशेष अध्ययनासाठी राजर्षी शाहु महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिक मदत दिली जात आहे. या योजनेंतर्गत यापूर्वी ३० एप्रिलपर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली होती. ही मुदत आता २० मेपर्यंत वाढविण्यात आली आहे.

परदेशात विशेष अध्ययनासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्तीकरीता २० मेपर्यंत अर्ज स्विकारण्यात येणार आहे. राज्यातील अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरीया यांनी केले आहे.

या योजनेविषयी अधिक माहितीसाठी राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील ''रोजगार'' या लिंकवर भेट द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.